किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● वाचनरंग

५● लोकशाहीतील लोकसहभाग

११● दिशा प्रयत्नांची....

१९●काम हवे पुरेसे आणि चांगलेही...

२५●बेरोजगारीवरील 'स्ट्रक्चरल' उपाय


## अर्थबोधपत्रिका पुरवणी


३१ ● नागरी वाहतूक समस्येचे सद्यःचित्र



**खंड १० : अंक १२ मार्च २०१२**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- http://www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १० (अंक १२) मार्च २०१२**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# वाचनरंग

थंडी संपून उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. शीतपेयांच्या जाहिराती झळकू लागल्या आहेत. निसर्गातील रंगांची उधळण तनामनावर करणारा रंगपंचमीचा सण नुकताच संपला आहे. जगभरातील विविध विषयांच्या संदर्भातील घडामोडी समजून घेत, वैचारिक रंगसंगतीने सजलेल्या 'अर्थबोधपत्रिके'चा हा दहावा खंड या बाराव्या अंकाबरोबर संपतो आहे. एक एप्रिलपासून चालू होणा-या नव्या आर्थिक वर्षाबरोबर अकरावा खंड चालू होईल. 'अर्थबोधपत्रिका' हे एक वेगळ्या प्रकारचे मासिक आहे. ते अशा अर्थाने की साधारणपणे वृत्तपत्रे व अन्य नियतकालिके यांच्याद्वारे जी माहिती वाचकांना मिळते त्यापेक्षा वेगळे विषय वा काही विषयांशी संबंधित अधिक सखोल माहिती वाचकांना उपलब्ध करून देणे हे या मासिकाचे उद्दिष्ट आहे. माहितीचा व मनोरंजनाचा महापूर चहूबाजूंनी लोटतो आहे. अशा काळात मनोरंजनापेक्षा अभ्यासपूर्ण माहितीला महत्त्व देणारे हे मासिक आहे. अंकातील मजकूर संपादकीय विभागातर्फे तयार करण्यात येतो. कोणत्याही विषयांबाबत संस्थेने व लेखकांनी मत न मांडणे आणि वाचकांना आपले मत तयार करण्यासाठी विविध विषयांवरील वाचनसाहित्य उपलब्ध करून देणे हे 'अर्थबोधपत्रिके'चे उद्दिष्ट आहे. पर्यावरण, विज्ञान-तंत्रज्ञान, नवीन संशोधने, नागरीकरण, बेरोजगारी व अन्य आर्थिक, सामाजिक व राजकीय विषय मांडताना मत न मांडण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळले जाते. त्यामुळे ही मतपत्रिका नसून माहितीपत्रिका आहे, हे इथे पुन्हा एकदा स्पष्ट करतो आहोत. दहाव्या खंडातील बारा अंकांमधून मांडण्यात आलेल्या वैचारिक रंगसंगतीचा ऊहापोह नेहमीप्रमाणे एप्रिलच्या अंकात होईलच. पण फक्त एक बाब वाचकांना इथे सांगावीशी वाटते ती म्हणजे आपल्या सर्वांना भिडणा-या लोकशाहीशी संबंधित तसेच शहरीकरणाशी व औद्योगीकरणाशी संबंधित काही विषयांची दखल गेल्या तीन-चार अंकांमधून 'अर्थबोधपत्रिके'ने जाणीवपूर्वक घेतली आहे. या अंकात वाहतूक हा पैलू अभ्यासण्यात आला आहे तो याचाच भाग आहे.



जगभरात लोकशाही स्थापनेसाठी झालेल्या चळवळींनी गेले वर्ष गाजले. तशी लोकशाहीची चर्चा भारतातही गाजली ती भ्रष्टाचाराच्या व लोकपाल विधेयकामुळे. या दरम्यान, लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचाही मुद्दा उपस्थित झाला होता. या विषयांवरील चर्चा चालू असतानाच महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी चालू झाली. बाहेरचे वातावरण तापत असतानाच निवडणुकीची चर्चाही तापली होती. इतरांपेक्षा आपण कसे चांगले हे सांगण्याची अहमहमिका उमेदवारांमध्ये लागली होती. निवडून आलेले उमेदवार हे लोकप्रतिनिधी असून त्यांची मतदारांबरोबर विविध विषयांवर चर्चा होणे लोकशाहीत अपेक्षित आहे. असे न होण्यामागे नागरिकांची अनास्था हे एक मोठे कारण आहे. नागरिक म्हणून असलेला आपला मत देण्याचा अधिकार व कर्तव्य नागरिक पार पाडत नाहीत. एकीकडे शहरीकरणाचा वेग आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न वाढत असले तरी शहरांमधील नागरिक मतदानाबाबत फारसे उत्साही नाहीत असेच दिसून आले. ग्रामीण भागातील मतदानाच्या टक्केवारीचे प्रमाण अधिक असले तरी लोकशाहीतील एकूणच नागरिकांचा सहभाग वाढायला हवा आहे. म्हणून नागरिकांचा सहभाग वाढण्यासाठी नागरिकांनीच केलेल्या प्रयत्नांची दखल या अंकात आवर्जून घेतली आहे. जागतिक ते स्थानिक अशा विविध विषयांचे वाचनरंग 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणा-या वाचकांचे विचारविश्व रंगतदार करतील अशी आशा आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकीय - १

# लोकशाहीतील लोकसहभाग

लोकसहभाग वाढला तर लोकशाही अधिक सशक्त बनेल असे मानले जाते. लोकशाही बळकट करण्याच्या उद्दिष्टाने स्थानिक स्वराज्यसंस्थाना अधिक अधिकार देण्यासाठी १९९३मध्ये भारतीय राज्यघटनेत ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायती, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या कामकाजात लोकांचा सहभाग वाढणे अपेक्षित आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले आहे (दरम्यान, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले आहे). १९९३ मधील घटनादुरुस्तीनंतर विविध राज्यांत झालेल्या राजकीय व सामाजिक परिणामांचा अभ्यास अनेक संस्था-संघटनांकडून करण्यात आलेला आहे. असाच एक अभ्यास Citizen Initiatives And Democratic Engagement : Experiences from India या ग्रंथाद्वारे करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाबाबत नागरिकांना जागरुक करण्यासाठी नागरिकांनीच केलेल्या प्रयत्नांची दखल या पुस्तकाने घेतली आहे. महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकांच्या, झालेल्या मतदानाच्या टक्केवारीच्या आणि विशेषतः, काही शहरांमध्ये नागरिकांचे गट निवडणुकीत उतरल्याच्या पार्श्वभूमीवर, उत्तरेकडील काही राज्यांमधील हा अभ्यास समजून घेणे उद्‌बोधक आहे.

राजकीयदृष्ट्या काही किमान लोकसहभागाची तरतूद भारतात मतदानाच्या अधिकाराच्या रुपाने करण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी म्हणजे नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार बजावणे होय. पण साधारणपणे कोणत्याही निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी पाहता नागरिक हा अधिकार फार मोठ्या प्रमाणावर बजावत असल्याचे चित्र आढळत नाही.



नागरिकांचा सहभाग वाढण्याबाबत आज अनेक प्रकारचे प्रयत्न चालू आहेत; तरी चालू शतकाच्या सुरुवातीला झालेले असे उपक्रमही दखल घ्यावे असे आहेत. नागरिकांनी या अधिकाराचा उपयोग करावा यासाठी ‘सोसायटी फॉर पार्टिसिपेटरी रीसर्च इन् एशिया’तर्फे २००० व २००४ मध्ये झालेल्या निवडणुकांच्या आधी एक उपक्रम राबविण्यात आला होता. त्यात प्रामुख्याने महिलांचा सहभाग वाढण्यावर व त्यांच्या या संदर्भातील विविध अनुभवांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. कारण, घटनादुरुस्तीद्वारे ३३ टक्के आरक्षण मिळल्याने महिलांचा राजकारणातील सहभाग वाढून राजकीय समीकरणे बदलण्याची तसेच नागरिक म्हणून महिला सक्रिय बनून लोकशाही अधिक बळकट होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**अनुभव अभियानातील**

काही नागरी संघटनांच्या (CSO - सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन्स) मदतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला ‘निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान’ असे संबोधण्यात आले होते. या अभियानातंर्गत तीन मुद्यांवर भर देण्याचे ठरविण्यात आले होते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मतदान करणे का महत्त्वाचे आहे, मत देताना उमेदवारांमधील कोणत्या क्षमतांना महत्त्व द्यायचे आणि आपले मत वैध ठरण्यासाठी म्हणजे योग्य प्रकारे मतदान करण्यासाठी नेमकी कोणती काळजी घ्यायची, हे ते तीन मुद्दे होते. याचबरोबर राजकीय पक्षांकडे सक्षम उमेदवार नाहीत असे वाटत असल्यास, नागरिकांमधील उत्साही व सक्षम व्यक्तिंनी निवडणुकीत उभे राहावे असे आवाहनही करण्यात येत होते. याबाबतची माहिती देणारी पत्रके व अन्य साहित्य गाडीत होते. या गाडीचे नाव ‘विकास रथ’ असे होते. प्रचाराचा ‘विकास रथ’ चालविणा-या चालकाला पहिले दोन दिवस हा सर्व खटाटोप कळत नव्हता. तो अशिक्षित होता. पण नागरिक कार्यकर्त्यांच्या घोषणा, भाषणे आणि नागरिकांशी सतत साधण्यात येणारा संवाद यांमुळे या विषयाबाबतची त्याची उत्सुकता वाढली. नागरिकांकडून करण्यात येणारे व एक प्रकारे पक्षविरहित म्हणून ‘अ-राजकीय’ असलेले हे काम आणि राजकीय पक्ष करतात तो प्रचार यांतील फरक त्याने स्वतःहून प्रश्न विचारून समजून घेतला.

त्यातून त्याची नागरिकत्वाबाबतची जाण वाढली. पहिले दोन दिवस केवळ गाडी चालविणारा चालक तिस-या दिवशी अगदी सहजपणे चालक-कार्यकर्ता बनला होता. प्रचाराच्या दृष्टीने योग्य ठिकाणी गाडी थांबवून तो स्वतःच स्थानिक भाषेतून संवाद साधून लोकांना एकत्र आणण्याचे काम करू लागला. आपण अशिक्षित आहोत हे विसरून तो लोकांना महिती देऊ लागला. विकास म्हणजे काय, तो घडवून आणण्यासाठी कसे प्रयत्न करावे लागतील, विकासकामे करण्यासाठी उमेदवाराकडे कोणत्या क्षमता असाव्या लागतील, असे सर्व तो स्थानिक भाषेतून व स्थानिक चालीरीती व परंपरा समजून घेऊन सांगू शकत होता. त्यामुळे अभियान राबविणा-यांनाही त्याची मदत होऊ लागली. पहिल्या चार-पाच दिवसांतच हा चालक संबंधित चमूबरोबर बैठकींमध्ये बसू-बोलू लागला व प्रचार-अभियान यशस्वी व्हावे या दृष्टीने सल्ले देऊ लागला. राजकीय व्यक्तिमत्वाभोवती फिरणारी ग्रामीण भागांतील चर्चा या अभियानानंतर नेतृत्व गुणांच्या चर्चेकडे वळली. तसेच विकासाचे मुद्दे पुढे आले.

'आमने-सामने' असा एक कार्यक्रम प्रचारादरम्यान होता. उमेदवार व मतदार यांनी समोरासमोर बसून चर्चा करायची, असे त्याचे स्वरूप होते. महिलांच्या विकासासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरला. हरयानामधील दोन जिल्ह्यांमधील कार्यक्रमांच्या वेळी महिलांमधील भीड चेपली व त्या धीटपणे पुढे येऊन आपले विचार सांगू लागल्या. पण या महिला उच्च जातीतील होत्या. त्यामुळे त्यांना जातीचा फायदा मिळाला, असे म्हटले गेले. या नंतर गंमत अशी घडली की, केवळ ठरावीक जातीतील महिलांनीच पुढे यावे असे होऊ नये, तर सर्वच जातीतील महिलांनी पुढे यावे व आपला सहभाग वाढवावा, असे मत मांडण्यात आले. परिणामी, केवळ विशिष्ट वर्गातील महिलांनाच नव्हे तर तळागाळातील महिलांनाही सर्व संधी उपलब्ध व्हायला हव्यात हे सर्वांना पटले व अन्य महिलाही सक्रिय झाल्या.

महिलांबाबतच्या दृष्टिकोणात आणखी एक बदल घडून आला. हशनपूर या खेड्यातील एका वयस्कर महिलेने परंपरा बाजूला ठेवून आपला बुरखा दूर सारला आणि पुरुषांनी स्त्रियांच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा असे आवाहन केले. शिवाय पाठिंबा देताना बुरख्यासारख्या बाबीचा



मुद्दा पुरुषांनी बाजूला ठेवावा, असेही त्या महिलेने स्पष्ट केले. पुरुषांनी पाठिंबा दिला नाही तर महिला आपला बुरखा स्वतःहून बाजूला ठेवतील असा इशाराही तिने दिला. त्या वेळी त्या महिलेसमोर मुख्य प्रश्न बुरख्याचा नव्हता. तर, एक नागरिक म्हणून असलेले आपले अधिकार डावलले जात असल्याच्या निषेधार्थ तिने बुरखा दूर करण्याचा मार्ग स्वीकारला होता, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. स्त्रियांना अधिकार मिळावेत यासाठी ज्येष्ठ स्त्रियांनी पुढाकार घेतला पहिजे, असे मत त्यावेळी तिने मांडले होते.

महेन्द्रगड येथे एक वेगळी घटना घडली. तेथील सरपंचपद स्त्रियांसाठी राखीव नव्हते. अशा ठिकाणी एका महिलेने पुरुष उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढविण्याचे ठरवले. पुरुषांच्या वर्चस्वाला आव्हान देताना तिने चांगलीच तयारी केली होती. 'आमने-सामने' या कार्यक्रमाच्या वेळी या महिलेने आपला जाहीरनामा मतदारांसमोर मांडला तेव्हा सर्वजण आश्चर्यचकित झाले. तिने भ्रूणहत्या, स्त्रियांचे आरोग्य व मुलींचे शिक्षण यांना प्राधान्य देण्याचे ठरवले होते. तिचा जाहीरनामा आणि पुरुष उमेदवारांसमोर तिने दाखवलेला आत्मविश्वास यांमुळे मतदारांनी तिला निवडून दिले. मतदार जागृती अभियानानंतर नागरिक सजग बनले. एका ठिकाणी एक महिला उमेदवार आपल्या मतदार संघात मद्यवाटप करीत असल्याचे आढळल्यानंतर नागरिकांनी त्या महिलेला निवडून दिले नाही.

या अभियानाच्या वेळी हरयानातील सुमारे ५०० महिलांना सहभागी करून घेण्यात आले होते. नारी नेटवर्क, महिला मंडळे, बचत गट, युवती मंडळे, अंगणवाडी सेविका इत्यादी ठिकाणी काम करणा-या या महिला होत्या. सत्तेची समीकरणे बदलताना अशा गटांची फार मदत होते, असे या अभियानाच्या वेळी दिसून आले.

हिमाचल प्रदेशातील एका प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळी अनुसूचित जातीजमातीमधील एक महिला ग्रामपंचायतीचे कामकाज समजावून घेण्यात बराच रस घेत होती व तिची समजही चागली होती, असे संबंधितांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी तिला निवडणुकीत उभे राहण्यास सुचविले. महिला मंडळची सक्रिय सदस्य असलेल्या या महिलेला मंडळाचा पाठिंबा होता. अनुसूचित जातीजमातीमधील एक महिला खुल्या जागेवर पुरुषांच्या

विरोधात लढणार याला समाजातून विरोध होणे स्वाभाविक होते. तेव्हा अनेक वर्षांपासून आपले वर्चस्व टिकवून असलेल्या प्रमुख राजकीय नेत्याकडून निवडणुकीच्या वेळी मद्यवाटप करण्यात आले तसेच मते विकत घेण्यात आली. त्या नेत्याने हरप्रकारे प्रयत्न करून त्या महिलेस पराभूत केले. पण या निवडणुकीचा परिणाम असा झाला की पुरुषांना महिला मंडळाच्या सदस्यांना ग्रामपंचायतीच्या कामकाजात सहभागी करून घ्यावे लागले. महिलांचे म्हणणे काय आहे ते पुरुष समजून घेऊ लागले. तसेच जातीचा मुद्दा मागे पडला.

काही प्रश्नांकडे पुरुष उमेदवारांचे लक्ष जात नाही पण ते प्रश्न महत्त्वाचे असतात. ही बाब लक्षात घेऊन एका गावातील महिला उमेदवाराने आपल्या गावातील पाण्याच्या प्रश्नाकडे मतदारांचे लक्ष वेधले. निवडणुकीत उभे राहताना 'पाण्याचा पंप' हेच तिचे निवडणूक चिन्ह होते. समाजातील सर्वच घटकांसाठी हा विषय महत्त्वाचा होता. पाण्याच्या प्रश्नाबाबत निवडून आल्यानंतर काय करणार, याचा विचारही तिने केला होता. पाण्याच्या नवीन जलवहिन्या बांधण्याआधी पाण्याची गळती थांबविणे गरजेचे असून ते सहज शक्य असल्याचे तिने मतदारांना सांगितले. ही गळती थांबविल्यानंतर नवीन जलवहिन्यांच्या कामाला प्राधान्य देण्यात येईल, असे तिने स्पष्ट केले. धोरणे आखताना व कामकाज करताना पारदर्शकता गरजेची आहे, हे तिने मतदारांच्या मनावर बिंबवले.

निवडून आलेल्या काही लोकप्रतिनिधींचा अनुभव या अभियानाने जाणून घेतला. विशेषतः, प्रत्यक्ष काम करताना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. हरयानातील एका उच्चशिक्षित महिलेला पुरुषी वर्चस्वाचा व द्रुष्टिकोणाचा त्रास सहन करावा लागला. राखीव जागेवर निवडून आल्यानंतर सरपंचपदावर काम करीत असतान ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामकाजाबाबतची सखोल माहिती मिळविण्याचा तिने प्रयत्न केला. तिच्या प्रश्नांमुळे नाराज झालेल्या संबंधित अधिका-याने फाईली हलविल्या व तिला हैराण केले. प्रकरण कमिशनरांपर्यंत गेले व त्या अधिका-याला 'पेनल्टी' भरावी लागली. ग्रामीण भागात शिक्षण व साक्षरता मोहिम हे गरजेचे आहे, कारण लिहिता-वाचता न येणा-या



ग्रामीण नागरिकांना फसवले जाते, असा सरपंचपदावर काम करतानाचा तिचा अनुभव होता. अर्थात निवडणुकीत व प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होऊ शकणा-या महिलांची संख्या जेमतेम ३३ टक्के असली तरी त्या निमित्ताने अनेक घरांमध्ये या सर्व विषयांबाबत जागरुकता निर्माण झाली. महिला मंडळाच्या सदस्य असलेल्या स्त्रियांच्या घरी मुलगा व मुलगी असा भेद होता. तो कमी होण्याच्या दिशेने कृती होऊ लागली. मुला-मुलींना समान वागणूक मिळावी यासाठी दृष्टिकोणात बदल होऊ लागला. मुलींप्रमाणे मुलांचा घरकामातील सहभाग हळूहळू वाढू लागला. मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यात येऊ लागले.

दुस-या एका गावात या अभियानाने एक वेगळाच बदल घडवून आणला. जातीपातीला मानणा-या विविध समाजगटांमध्ये जातीभेदाच्या द-या बुजविण्याची सुरुवात या निमित्ताने झाली. त्याचे कारण असे घडले की त्या गावात सरपंचपद राखीव झाले होते. मग, गावाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यासाठी सर्व जातीतील ज्येष्ठ नागरिक एकत्र आले. तेव्हा ग्रामसभेमध्ये जातीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी बसण्याचे संकेत आपोआप बाजूला पडले आणि एका 'चारपाई'वर भिन्न जातीय एकत्र बसले. गंमत अशी की, असे घडल्याचे संबंधितांना तेव्हा जाणवलेही नाही. सभा संपल्यानंतर ही बाब लक्षात आली. तेव्हा जे झाले ते चांगलेच झाले, असे सर्वांनाच वाटले. या शिवाय, आता पुढील कामकाजात जातीविषयक अडचणीचे मुद्दे दूर सारून विकासकामे सुरळितपणे पुढे सरकतील, असा आशावाद सर्वांच्या मनांत निर्माण झाला.

या अभियानामुळे हिमाचलप्रदेश व राजस्थान येथील अनेक गावांमध्ये निवडणुका व पंचायतीचे कामकाज, गावाचे, समाजाचे प्रश्न, त्याच्या सोडवणुकीबाबत करायच्या उपाययोजना याबाबत स्त्रिया व पुरुषांमध्ये चर्चा होऊ लागली. गावाचा कारभार सर्वांनी मिळून करण्यावर भर देण्यात येऊ लागला. ही झाली अभियानातील काही प्रत्यक्ष उदाहरणे. लोकशाही रुजण्याच्या दिशेने राबविण्यात आलेले हे अभियान ब-याच प्रमाणात यशस्वी ठरले असले तरी अभियान राबवण्याच्या नियोजनाशी संबंधित अशा विविध पैलूंचा विचार करणेही इथे गरजेचे ठरते. ■■

राजकीय - २

# दिशा प्रयत्नांची...

पाच वर्षांतून एकदा येणा-या निवडणुकीत मतदान केल्यानंतर लोकशाहीत लोकांनी सहभागी होण्याचा प्राथमिक पातळीवरील एक टप्पा पूर्ण होतो. त्याचबरोबर लोकशाही व्यवस्थेची पुढील प्रक्रिया चालू होते. या प्रक्रियेचाही विचार 'निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियाना'ने केला होता. या अभियानाने लोकशाहीसंदर्भात केलेले सर्व प्रकारचे प्रयत्न कसे होते, त्यांना मिळालेला प्रतिसाद कसा होता इत्यादी अनेक बाबींचा म्हणजे या संपूर्ण अभियानाचा विचार/विश्लेषण केले तर नागरिकांचा सहभाग हा विषय अधिक नेमकेपणाने समजून घेता येईल.

७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य सस्थांना (व पर्यायाने नागरिकांना) मिळालेले अधिकार वापरण्यासाठी नागरिक सक्षम आहेत, आपले हित-अहित त्यांना कळते आणि त्यानुसार योग्य निर्णय ते घेऊ शकतील या गृहितकावर/विश्वासावर सहभागात्मक लोकशाहीची संकल्पना व कार्य आधारलेले आहे. या घटनादुरुस्तीपूर्वी अनेक राज्यांत बरीच वर्षे स्थानिक स्वराज्य सस्थांच्या निवडणुका झालेल्या नव्हत्या. घटनादुरुस्ती झाली तरी हितसंबंधांचे राजकारण रुजलेल्या, जातीजमातींचे वर्चस्व असलेल्या आणि शिक्षणाची दैना असलेल्या ग्रामीण भागांत सत्तेचे हस्तांतर होणे ही बाब अवघडच होती. असे हस्तांतर घडून येण्यासाठी वेगवेगळ्या समाजगटांत दृष्टिकोणांत बदल होणे गरजेचे असते. हा बदल होण्यासाठी लोकशिक्षण आणि विविध प्रकारच्या महिती लोकांना उपलब्ध होणे, ही आवश्यक बाब ठरते. त्यामुळे ग्रामीण भागांत लोकशाहीबाबत जनजागृती करण्याचे कार्य प्राधान्याने करण्याचे अभियानाने ठरविले होते.

यात नागरी संस्था (CSO - सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन्स) आणि राज्य निवडणूक आयोग यांचीही मदत घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. हिमाचल प्रदेश, हरयाना, उत्तराखंड, गुजरात, झारखंड, बिहार, ओडिशा, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश आणि केरळ या राज्यांमधील



जास्तीतजास्त ठिकाणी पोहचण्याचे प्रयत्न या वेळी करण्यात आले (अभियानासंबंधीची माहिती देणारे तक्ते लेखाच्या शेवटी देण्यात आले आहेत). राज्यांत जेव्हा जेव्हा निवडणुका असतील तेव्हा तेव्हा अभियान राबविण्याचे ठरविण्यात आले. अभियान राबविताना स्थानिक गरजा लक्षात संपूर्णपणे लवचीक धोरण स्वीकारण्यात आले होते. उदाहरणार्थ, ओडिशामध्ये दारुबंदी चळवळीबरोबर अभियान जोडले जाणे गरजेचे वाटले तेव्हा तसा निर्णय घेण्यात आला. अन्य राज्यांत साक्षरता, शिक्षण, मुलींचे शिक्षण, आरोग्य, दुष्काळ, पिण्याच्या पाण्याचा तसेच सांडपाण्याचा प्रश्न असे अनेक विषय या अभियानाशी वेळोवेळी जोडले गेले. कारण, ते नागरिकांचे, मतदारांचे प्रश्न होते आणि राजकीय व प्रशासकीय बाबींमुळे निवडणुकीच्या काळात ते विषय चर्चिले जाणे हे स्वाभाविक होते. याचबरोबर विकासाचे मुद्दे पुढे आले की लोकशाही, राजकारण आणि सत्तेचे हस्तांतर यांतील साखळी स्पष्ट होते. ती लोकांपुढे येणे हे या अभियानासाठी महत्त्वाचे होते. राजकारणापासून दूर राहायचे आणि कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा द्यायचा नाही, असे अभियानाने ठरवले होते.

निवडणुकीच्या काळात उपस्थित करण्यात आलेले काही मुद्दे हे राजकीय पक्षांमध्ये, निवडून आलेल्या व न आलेल्या उमेदवारांमध्ये छोटेमोठे संघर्ष निर्माण करणारे असू शकतात/असतात. पण संघर्षाच्या वाटेला न जाता मतभेद विसरून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आपले काम नीटपणे समजून घेणे व करणे गरजेचे असते. मतदारांनी निवडून दिले असल्याने त्यांनी लोकप्रतिनिधीची भूमिका चोखपणे बजावणे इथे अपेक्षित आहे. तसेच निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी चांगले कार्य करावे यासाठी त्यांना सहकार्य करणारे वातावरण सर्वच राजकीय पक्षांमध्ये, लोकशाही व्यवस्था राबविणा-या यंत्रणेत व समाजात असायला हवे. संघर्ष टाळून नागरिकांच्या हितासाठी व गावाच्या विकासासाठी त्यांनी काम केले तर लोकशाहीची वाटचाल प्रगल्भ लोकशाहीकडे होऊ शकते. यासाठी विविध प्रकारची महिती उपलब्ध होणे ही सर्वांत महत्त्वाची बाब ठरते. त्यामुळे मतदारांनी घेतलेली भूमिका व त्यांचा कल आणि लोकप्रतिनिधीचे कर्तव्य व जबाबदारी हे दोन विषयदेखील निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियानाने

महत्त्वाचे मानले होते. अभियानाची रुपरेषा आखताना वरील सर्व बाबींचा विचार करण्यात आला होता. हरयानातील एका ठिकाणच्या गटाचे नाव 'मतदाता जागरुकता मंडळी' असे होते. मतदान का व कशा प्रकारे करायचे, खुल्या वातावरणात न्याय्य पद्धतीने निवडणुका होण्यासाठी काय केले पाहिजे, मतदारांनी मत देताना कोणते मुद्दे विचारात घ्यायचे इत्यादी बाबींचा प्रचार या गटाने केला तेव्हा समाजातील सर्व घटकांकडून त्याला भरघोस पाठिंबा मिळाला. तसेच 'दलित खाप पंचायती'नेदेखील या गटाला मोठे सहकार्य केले. निवडणुकीत मद्यवाटप होऊ द्यायचे नाही अशी भूमिका 'दलित खाप पंचायती'ने घेतली होती. 'दलित खाप पंचायती'चा गावात प्रभाव असल्याने आणि त्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने या गटाच्या कामाला यश मिळाले. मात्र जेथे खाप पंचायती अशा अभियानाला विरोध करतात, तेथे यश मिळणे कठीण होते कारण खाप पंचायतीचा आदेश झुगारणे शक्य होत नाही, असेही लक्षात आले.

स्थानिक परिस्थिती समजून घेऊन अभियान राबवणे, हे एक आव्हानाचे काम होते. त्यामुळे मतदारांशी संवाद साधण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबविण्यात आले. अभियानांतर्गत एक गंमतीची बाब अशी होती की, नागरी संस्थांचा व राज्य निवडणूक आयोगासारख्या संस्थांचा सहभाग असल्याने अभियानासाठी काम करणा-यांमध्ये शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागांतील नागरिकांचा सहभाग होता. त्यामुळे अभियानाची आखणी करतानाच लोकशाहीशी संबंधित अनेक मुद्यांवर चर्चा होत होती. अभियान राबवताना संबंधितांना या चर्चांचाही उपयोग झाला. योग्य माहिती, योग्य वेळी, योग्य शब्दांत मतदारांपर्यंत पोहचणे हे आवश्यक असल्याने अभियानाच्या संयोजकांनी प्रशिक्षण देणा-यांचे प्रशिक्षणही केले होते, तसेच 'फिरती सूचना केंद्रे' स्थापन केली होती. या प्रशिक्षणाच्या वेळी मतदारांनी मतदान कसे करायचे हे प्रशिक्षणार्थीना सांगण्यात आले. तेव्हा या प्रशिक्षणार्थींना असे लक्षात आले की, एका मतदाराला मत देण्यासाठी चार ते पाच मिनिटे लागतात. या हिशोबानुसार निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार फक्त ४० ते ४५ टक्के मतदान पूर्ण झाले असते. म्हणजे निम्म्या लोकसंख्येला



मतदानाचा अधिकार बजावताच आला नसता. ही बाब निवडणूक आयोगाच्या नजरेस आणून दिल्यानंतर वेळापत्रकात योग्य ते बदल करण्यात आले. इतक्या बारकाव्यांचा विचार या अभियानाने केला होता.

मतदारांशी संवाद साधण्यासाठी भित्तीपत्रे, हँडबील, दृकश्राव्य माध्यमे, पदयात्रा, चर्चा अशा अनेक मार्गांचा अवलंब अभियानातर्फे करण्यात आला होता. याचबरोबर आमने-सामने, मतदार रथ, जागरुकता रथ, सायकल रॅली, प्रभात फेरी, नुक्कड नाटक, नुक्कड सभा, युवकांसाठी व महिलांसाठी संमेलने, मेळावे, हेल्पलाइन, बैठका इत्यादींचे आयोजनही करण्यात आले होते. कुठे लोककलांचाही उपयोग करण्यात आला होता. नागरिकांमध्ये परस्पर संवाद, चर्चा आणि वादविवाद असे उपक्रमही आखण्यात आले होते. वेगवेगळ्या उपक्रमांना वेगवेगळ्या ठिकाणी कमी-जास्त प्रतिसाद मिळाला. मतदारांमधील साक्षरतेचे प्रमाण, स्थानिक चालीरीती व परंपरा, जाती-जमातींमधील सामंजस्य व सहकार्य वा मतभेद, नागरी संस्थांचे कार्य, नागरिकांचे प्रश्न अशा अनेक बाबींवर हा प्रतिसाद अवलंबून होता.

हिमाचल प्रदेशात रेडिओवरील जागरुकता अभियानाला चांगला प्रतिसाद मिळाला. निवडणूक प्रक्रियेबाबत मतदारांना शिक्षण देताना बिहारमधील कार्यकर्त्यांनी रंगीत कपड्यांचा उपयोग केला होता. मुखियांच्या निवडणुकीसाठी हिरव्या रंगाची मतपत्रिका होती म्हणून काहींनी हिरवे कुडते घातले होते. याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या सदस्यांसाठी काळी मतपत्रिका व काळा कुडता, पंचायत समिती सदस्यांसाठी निळा आणि जिल्हा परिषद सदस्यांसाठी लाल रंगाचे कुडते घालून मतदारांचे शिक्षण करण्यात आले होते. स्थानिक भाषेचा व शब्दांचा चपखलपणे वापर करण्याला प्राधान्य देण्यात आले होते. 'नारी तेरी बारी, की चुनाव में भागीदारी', 'हमारा उम्मीदवार ऐसा हो', 'ना चुनेंगे अब हम कठपुतली उमेदवार, वोट डालेंगे अपना हम करेंगे सोचविचार, चुनेंगे हम योग्य उम्मीदवार' अशा घोषणा लोकप्रिय ठरल्या होत्या. ग्रामीण भागांत नुक्कड नाटकांचे प्रयोग यशस्वी झाले. स्थानिक भाषेतून संवाद साधणारा 'कलाजत्था' हा उपक्रम लोकप्रिय ठरला. ग्रामसभेचे कामकाज, दैनंदिन जीवनांतील प्रसंग व त्यावर नागरिकांनी शोधलेली उत्तरे अशी काही माहिती या कार्यक्रमांद्वारे देण्यात आली.

आंध्रप्रदेशातील १२० जिल्ह्यांमध्ये कलाजत्था प्रभावी ठरला. साक्षरतेचे प्रमाण कमी होते तिथे पोस्टर्स व हँडबील यांपेक्षा कलाजत्था, नुक्कड नाटक व नुक्कड सभा हे प्रकार लोकप्रिय ठरले. असे विविध कार्यक्रम स्थानिक केबल चालकांनी प्रसारित करावे यासाठीही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे असे कार्यक्रम घरोघरी पोहचले. राज्य निवडणूक आयोग आणि नागरी संस्था यांच्या सहकार्यामुळे हे अभियान व्यापक प्रमाणावर अनेक राज्यांमध्ये/जिल्ह्यांमध्ये पोहचले. या सर्व प्रयत्नांचा अपेक्षित परिणाम दिसून आला. काही ठिकाणी तर ७५ ते ८० टक्के मतदान झाले.

'निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियाना'नंतर नागरिकांचा सहभाग वाढून लोकशाहीची पाळेमुळे अधिक खोलवर रुजण्याबाबतच्या या प्रयत्नांचा पुढचा टप्पा म्हणून लगेचच 'पंचायती राज जागरुकता अभियान' हाती घेण्यात आले होते. एका प्रकारे 'निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियाना'ने पेटवलेली लोकसहभागाची ठिणगी प्रज्वलित ठेवण्याचे काम 'पंचायती राज जागरुकता अभियाना'ने करणे अपेक्षित होते.

निवडणुकीचा धुराळा खाली बसल्यानंतर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने व लोकांना विश्वासात घेऊन काम करणे गरजेचे ठरते. त्यासाठी त्यांना लोकशाही यंत्रणेचे काम कसकशा प्रकारे चालते याची सर्वंकष माहिती करून घ्यावी लागते. यांत सभेच्या कामकाजाच्या पद्धतींपासून अनेक नियमांची, कायद्याची व अन्य बाबींची माहिती असावी लागते. ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीनंतर झालेल्या निवडणुकांमध्ये अनेक जण प्रथमच निवडून आल्याने त्यांना प्रशासकीय व अन्य बाबींमधील बारकावे माहिती असण्याची शक्यता कमीच होती. त्या दृष्टीने 'पंचायती राज जागरुकता अभियाना'ने काम केले.

'लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण' ही एक महत्त्वाची बाब आहे. पण अनेक राज्यांमध्ये अशा प्रकारच्या प्रशिक्षणाच्या सोयी नाहीत, असे तेव्हा लक्षात आले. विशेषतः, मध्यप्रदेश, हरयाना, राजस्थान, उत्तरप्रदेश, हिमाचल प्रदेश ही राज्ये यांत पिछाडीवर आहेत असे आढळले. तेव्हा अशा प्रशिक्षणासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्याचे 'पंचायती राज जागरुकता आभियाना'ने ठरवले होते.



वेळेच्या मर्यादेत अशा कार्यशाळांचे आयोजन करताना गावातील राजकारण बाजूला ठेवून कायदेकानू, धोरणे, विकासविषयक मुद्दे, प्रशासकीय व अन्य बाबी यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. महिला व अनुसूचित जाती-जमातींमधील लोकप्रतिनिधी यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. ग्रामपंचायतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन अशा कार्यशाळा आयोजित करून त्या संबंधीच्या छोटयामोठया कामकाजात स्थानिकांना सहभागी करून घेण्याचाही प्रयत्न त्या वेळी करण्यात आला.

या शिवाय, ग्रामसभा कृतिशील बनावी यासाठीही प्रयत्न करण्यात आले. ग्रामसभेत नागरिकांचा सहभाग वाढावा, उपस्थिती वाढावी हे प्राथमिक उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते. त्यातही वंचित घटकांनी व स्त्रियांनी ग्रामसभेचे कामकाज समजून घेऊन निर्णयप्रक्रियेत अधिक प्रमाणात सहभागी व्हावे, यावर भर देण्यात आला. ग्रामसभेच्या कामकाजात पारदर्शकता असावी आणि ती गावातील लोकांना जबाबदार असावी हे दुसरे उद्दिष्ट होते. गावातील कामांचे, विकासाचे प्राधान्यक्रम नागरिकांना समजावे यासाठी नागरिकांमधील जाण वाढण्याकडे लक्ष देतानाच पंचायती सक्षम बनाव्यात यासाठी पाठिंबा व मदत करण्याचे ठरविण्यात आले.

ग्रामसभेला उपस्थित राहता यावे या दृष्टीने ग्रामसभेच्या आयोजनाची पूर्वसूचना सर्वांना मिळण्याची व्यवस्था मार्गी लावणे व या सभेत उपस्थित राहून नागरिकांना आपले अधिकार बजावण्याची संधी कशी मिळणार आहे हे त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच कोणकोणत्या समाजगटांतील किती व्यक्ति उपस्थित आहेत, कोणत्या विषयांवर चर्चा झाली, त्या चर्चेदरम्यान कोणते मुद्दे पुढे आले अशा बारिकसारिक बाबींची नोंद ठेवण्यात आली. या तपशीलाच्या आधारे पुढील योजना आखण्यावर भर देण्यात आला. पंचायतीचे कामकाज लोकांपर्यंत पोहचावे यासाठीही अभियानाने विशेष प्रयत्न केले. पंचायतीच्या कामकाजाशी परिचित असलेल्या व्यक्तींच्या मदतीने 'पंचायत मित्र' अशी योजना राबविण्यात आली. कुठे 'साथी संमेलने' आयोजित करण्यात आली. विविध प्रकारची महिती देणारा 'संचार गट'ही कार्यान्वित करण्यात आला.

अशा विविध प्रयत्नांमुळे ग्रामसभेच्या कामकाजातील नागरिकांचा सहभाग वाढला. याचबरोबर नागरिकांचा सहभाग कायमच वाढता असावा यासाठी महिला मंडळे, युवा संघटना, बचतगट, शिक्षण समिती तसेच वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्य करणा-या संस्था व संघटनांना ग्रामसभेच्या कार्याशी जोडण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीद्वारे नागरिकांना मिळालेले अधिकार त्यांना उपयोगात आणता आले. तसेच घटनादुरुस्ती झाली तरी नागरिकांचा सहभाग वाढला तरच ती अर्थपूर्ण ठरते व ठरेल हेच या अभियानाने केलेल्या प्रयत्नांमधून दिसून आले. ■■

**निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान**
**तक्ता १ ग्रामीण भाग (२००४-०५)**

| राज्ये | वर्ष | एकूण जिल्ह्यांपैकी अभियान राबविण्यात आलेले जिल्हे | अभियान पोहचलेल्या ग्रामपंचायतीची संख्या | अभियानातील सहभागी नागरी संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|
| मध्यप्रदेश | २००५ | ४८ (४८) | ११८३६ (२२०२९) | २५० |
| छत्तीसगड | २००५ | १६ (१६) | ४६२१ (९१३९) | १५० |
| राजस्थान | २००५ | ३२ (३२) | ३००० (९१८९) | २५० |
| हरयाना | २००५ | १९ (१९) | ३००० (६०३४) | २३५ |

***संदर्भ*** - सोसायटी फॉर पार्टिसिपेटरी रीसर्च इन् इंडिया, पंचायत राज्यव्यवस्था सुधारणा या संदर्भातील वार्षिक अहवाल २००४-०५

***टीप*** - कंसातील संख्या एकूण जिल्ह्यांची व एकूण ग्रामपंचायतींची आहे.

**निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान, तक्ता २ शहरी भाग (२००४-०५)**

| राज्ये | निवडणुका झालेल्या नगरपालिकांची संख्या | अभियान पोहचलेल्या नगरपालिकांची संख्या |
|---|---|---|
| मध्यप्रदेश | ३०५ | ३६ |
| छत्तीसगड | १०६ | ४७ |
| राजस्थान | ४५ | ३ |
| हरयाना | ४७ | ११ |

***संदर्भ*** - सोसायटी फॉर पार्टिसिपेटरी रीसर्च इन् इंडिया, शहरप्रशासन संस्था वार्षिक अहवाल २००४-०५



**निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान, तक्ता ३ ग्रामीण भाग (२००५-०६)**

| राज्ये | वर्ष | एकूण जिल्ह्यांपैकी अभियान राबविण्यात आलेले जिल्हे | अभियान पोहचलेल्या ग्रामपंचायतीची संख्या | अभियानातील सहभागी नागरी संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|
| उत्तरप्रदेश | २००५ | ५२ (७०) | २५४४० (५२०२७) | ४०४ |
| केरळ | २००५ | १४ (१४) | ८५२ (९९१) | १६० |
| हिमाचलप्रदेश | २००५ | १३ (१३) | १६९० (३०३७) | ५६ |
| गुजरात | २००५ | ४ (२६) | ४६२ (१३८१९) | - |

***संदर्भ*** - सोसायटी फॉर पार्टिसिपेटरी रीसर्च इन् इंडिया, पंचायत राज्यव्यवस्था सुधारणा या संदर्भातील वार्षिक अहवाल २००५-०६

***टीप*** - कंसातील संख्या एकूण जिल्ह्यांची व एकूण ग्रामपंचायतींची आहे.

**निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान, तक्ता ४ शहरी भाग (२००५-०६)**

| राज्ये | वर्ष | जिल्हे | एकूण स्थानिक स्वाराज्य संख्या | अभियान पोहचलेल्या स्थानिक स्वराज्य संख्या | अभियानातील सहभागी नागरी संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| राजस्थान | २००५ | २१ | १२६ | ७५ | ६३ |
| आंध्रप्रदेश | २००५ | १७ | १०७ | ६७ | ८६ |
| केरळ | २००५ | ११ | ५८ | १४ | ६२ |
| हिमाचल प्रदेश | २००५ | ११ | ४६ | १७ | ५६ |
| एकूण | | ६० | ३३७ | १७३ | २६७ |

***संदर्भ*** - सोसायटी फॉर पार्टिसिपेटरी रीसर्च इन् इंडिया, शहरप्रशासन संस्था वार्षिक अहवाल २००५-०६

**निवडणूकपूर्व मतदार जागृती अभियान, तक्ता ५ ग्रामीण भाग (२००६-०७)**
**बिहार, आंध्रप्रदेश व गुजरात**

| | |
|---|---|
| अभियान पोहचलेले एकूण जिल्हे | ७५ |
| अभियानाशी संबंधित नागरी संस्थांची संख्या | ५९० |
| अभियानाने निवडणुकीत प्रोत्साहन व मदत दिलेल्या महिला उमेदवारांची संख्या | ३६५० |
| (यात दलित गटातील १५३६ व आदिवासी गटातील ४७६ महिलांचा समावेश आहे) | |

आर्थिक

# काम हवे पुरेसे आणि चांगलेही...

जगभरातील जवळपास सगळेच देश आज मोठ्या विचित्र कोंडीतून प्रवास करत आहेत. मंदी, महागाई आणि बेरोजगारी या तीनही आर्थिक अरिष्टांचे एक मोठे कडबोळेच जगाच्या विविध भागांत सध्या नांदताना दिसते. या तीन संकटांमध्ये डावे-उजवे करणे तसे व्यवहारतः अवघड असले तरी जागतिक अर्थव्यवस्थेसमोरील आजमितीचे सर्वांत क्लिष्ट आव्हान बेरोजगारीचेच आहे, यांबाबत फारसे दुमत होण्याचा संभव नाही. होतकरूंच्या रिकाम्या हातांना काम कसे मिळवून द्यायचे, हा सगळीकडच्याच धोरणकर्त्यांसमोरील मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही कारण, प्रत्येक मनुष्याच्या अंगी वास करणा-या सर्जनशील उत्पादक क्षमतांना पुरेपूर वाव देऊ शकेल, अशा प्रकारच्या रोजगार संधी पुरेशा प्रमाणात निर्माण करणे, ही सोपी गोष्ट नव्हे. जगभरातील उत्पादन तंत्रामध्ये ज्या प्रमाणे बदल घडून येत आहेत त्याच्याच जोडीने रोजगाराबाबतच्या तरूण होतकरूंच्या अपेक्षा आणि उद्योगव्यवसायांच्या मनुष्यबळविषयक गरजाही वेगाने बदलताना दिसतात. त्यामुळे, आनंददायक वाटेल असे अर्थपूर्ण आणि उत्पादक स्वरूपाचे दर्जेदार काम तरूण हातांना मिळवून देणे, ही खरोखरच कसोटी पाहणारी बाब ठरते आहे. या वास्तवाचे तरल पैलू निरखून बघण्याआधी बेरोजगारीच्या सध्याच्या समस्येची लांबीरुंदी प्रथम समजावून घेणे उपकारक ठरेल.

बेरोजगारीच्या प्रमाणात आज सर्वत्रच एकंदरीने जी वाढ झालेली दिसते तिची मुळे २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेत फुटलेल्या 'सब्प्राइम' कर्जांच्या फुग्यात रुजलेली आहेत, यात वादच नाही. यथावकाश त्या अमेरिकी मंदीचे वारे युरोपीय समुदायातील राष्ट्रांमध्येही प्रवेशले. अर्थात, युरोपीय समुदायातील काही राष्ट्रांमधील बँकांनी अमेरिकी 'टॉक्सिक ॲसेट्स' खरेदी केलेले असल्यामुळेच हे झाले, ही बाबही तितकीच खरी.



आज श्रमांच्या अमेरिकी बाजारपेठेतील चित्र काय दिसते ? अमेरिकी बेरोजगारीचे सध्याचे वास्तव अभ्यासण्याजोगे आहे. २००८ साली, म्हणजेच 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटण्याच्या अगोदर, बेरोजगारीचा अमेरिकी अर्थव्यवस्थेतील सरासरी दर पाच टक्क्यांच्या आसपास होता. अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे बराक ओबामा यांनी २००९ सालातील जानेवारी महिन्यात हाती पेलली त्या वेळी बेरोजगारीचा हाच सरासरी दर आठ टक्क्यांवर पोहोचलेला होता. आज हीच बेरोजगारी ९ ते १० टक्क्यांच्या परिघात आहे. २००८-०९ आणि २००९-१० या दोन वित्तीय वर्षांत चांगलीच हबकलेली अमेरिकी अर्थव्यवस्था आता सावरायला लागलेली आहे. परंतु, सकाळपासून चांगले पोटभर चरून जोगावलेली म्हैस ज्या प्रमाणे दुपारच्या टळटळीत उन्हात थंडगार चिखलात बसकण मारून मनःपूत बसते त्या प्रमाणे बेरोजगारीचे अमेरिकी अर्थव्यवस्थेतील ठाण काही उठायला तयार नाही. भारतीय अर्थव्यवस्थाही २००१-०२ ते २००६-०७ या कालावधीदरम्यान चांगली भरधाव वेगाने आगेकूच करत होती. मात्र, त्या संपूर्ण काळात भारतीय अर्थव्यवस्थेतील संघटित रोजगारवाढीचा वेग नगण्य असल्याने 'जॉबलेस ग्रोथ' अशा शे-याने तिची संभावना केली गेली. याच धर्तीवर, अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये अलीकडील काळात दिसू लागलेली हलचल 'जॉबलेस रिकव्हरी' म्हणून उपेक्षेची धनी बनताना दिसते.

अमेरिकी 'टॉक्सिक ॲसेट्स'मध्ये पैसे गुंतवल्याने अडचणीत आलेल्या बँकांना आधाराचा टेकू पुरवण्यासाठी युरोपीय समुदायातील काही देशांनी कर्जरोखे विकून पैसा उभा केला आणि बँकांचे पुनर्भांडवलीकरण केले. या प्रक्रियेत सरकारच्या माथ्यावर कर्जे वाढली. अमेरिकी बाजारपेठेतील मंदीच्या झळा लागल्याने युरोपीय समुदायातील देशांच्या अर्थव्यवस्थाही मंदीच्या चपेट्यात आल्या. उलाढाल मंदावल्याने सरकारांचे महसुली स्त्रोत आटले. मंदी वारण्यासाठी सरकारी खर्चाकडे हात सैल सोडण्याखेरीज पर्याय नव्हता. त्यामुळे वित्तीय तुटीचे आकडे फुगायला लागले. त्यातून पुन्हा कर्जे वाढली. या दुष्टचक्राला आळा घालण्यासाठी युरोपीय समुदायातील देशांनी आता काटकसरीचे धोरण अवलंबण्याकडे मोहोरा वळवलेला आहे. त्यामुळे, युरोपीय समुदायातील देशांमध्ये बेकारीचे संकट सघन होते आहे.

**रोजगारनिर्मितीचे आव्हान दुहेरी**

आजची स्थिती अशी आहे की, जगभरात जवळपास २१ कोटी लोक बेरोजगार आहेत. रोजगाराची वाढती गरज आणि मागणी लक्षात घेऊन तेवढ्या संधी निर्माण करण्याचे देशोदेशीचे आव्हान दुहेरी स्वरूपाचे आहे. रोजगार संधींची संख्या आणि गुणवत्ता या दोन्ही आघाड्यांवर इथून पुढच्या काळात धोरणकर्त्यांची कसोटी लागेल. म्हणजेच, प्रश्न केवळ पुरेशा रोजगाराचाच नाही तर, चांगल्या गुणवत्तेच्या, दर्जेदार आणि उत्पादक स्वरूपाच्या रोजगार संधी उपलब्ध करून देणे, ही एक मोठी परीक्षाच आहे. चांगल्या गुणवत्तेच्या रोजगार संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध न होण्याचा सर्वात अधिक फटका बसतो तो श्रमदलात नव्यानेच प्रवेश करीत असलेल्या तरूण श्रमिकांना. एक तर, मुळात नोक-याच मिळत नाहीत. आणि ज्या काही रोजगार संधी बाजारात दिसतात त्या निकृष्ट वा हिणकस स्वरूपाच्या आहेत, अशी दुहेरी अडथळ्यांची शर्यत तरुणाईला पार करावी लागते आहे. आंतरराष्ट्रीय श्रमदलाने केलेल्या एका अभ्यासाच्या निष्कर्षानुसार, ‘व्हल्नरेबल’ याच शब्दाने वर्णन करता येईल अशा रोजगारांत रोजीरोटी कमावणा-यांचे प्रमाण जगभरातील एकंदर श्रमदलात २००९ साली थोडेथोडके नाही तर चांगले ५० टक्के इतके होते. प्रत्यक्ष आकड्याच्या बाबतीत बोलायचे तर अशा श्रमिकांची संख्या भरते १५३ कोटी इतकी. स्वयंरोजगार अथवा अत्यल्प मेहेनताना देणारा कौटुंबिक रोजगार या दोनच रोजगार प्रकारांत हे श्रमिक गुंतलेले आहेत.

बेरोजगारीचा कालावधी हा देखील कामगारांच्या लेखी महत्त्वाचा मुद्दा ठरतो. त्या दृष्टीने अमेरिकी अर्थव्यवस्थेतील सद्यःस्थिती मोठी कठीण दिसते. एक वर्ष वा त्यापेक्षा अधिक काळ बेरोजगार असलेल्या व्यक्तींची गणना ‘दीर्घकालीन बेरोजगार’ म्हणून तिथे केली जाते. या व्याख्येनुसार ‘दीर्घकालीन बेरोजगार’ असलेल्यांचे एकंदर बेरोजगारांत असलेले प्रमाण २००७ साली होते अवघे १० टक्के. २०११ साली हेच प्रमाण पोहोचले होते ३० टक्क्यांवर. या सगळ्यात पुन्हा भरडले जातात ते तरूणच. स्पेनमध्ये एकंदर बेरोजगारांत तरूणांचे २००७ साली असलेले १७.६ टक्के इतके असलेले प्रमाण २०११ साली पोहोचले होते एकदम ४४ टक्क्यांवर !



त्यांतही पुन्हा, नोकरीवर अथवा श्रमदलात नव्यानेच भरती झालेले होतकरू तरूण सर्वांत अधिक पोळले जातात. याची कारणे दोन. एक तर, श्रमदलांत नुकतेच प्रवेशत असलेले हे तरूण श्रमिक, मुळात, कारखानदार नेमतात तेच कंत्राटी तत्त्वावर. या कंत्राटी कामगारांच्याबाबतीत ‘हायर ॲन्ड फायर’चा नियम आक्रमकपणे अवलंबला जातो. या उलट, उद्योगव्यवसायांत पूर्वीच भरती झालेले जुने, प्रौढ कामगार हे कायम नियुक्तीच्या तत्त्वावर कार्यरत असतात. त्या कामगारांना हात लावता येत नाही. एकंदरच वाढते वयोमान आणि सुधारलेला आहार व औषधोपचार यांमुळे अगदी वयस्कर होईपर्यंत अनेक कामगार सक्रिय राहतात. त्यामुळे, मुळात नवीन रोजगारेच्छूंसाठी जागाच खाली होत नाहीत. दुसरे म्हणजे, नोकरभरतीदरम्यान वयानुसार भेदभाव करण्यास प्रतिबंध करणारे कायदे अनेक देशांत जारी करण्यात आलेले आहेत. त्या कायद्यांतील तरतुदींचेही संरक्षण प्रौढ कामगारांना मिळते. परिणामी, श्रमदलात नव्यानेच भरती झालेल्या तरूण श्रमिकांना चांगल्या स्वरूपाचा उत्पादक रोजगार मिळणे अधिकच अवघड होऊन बसत असल्याचा अनुभव ठिकठिकाणी येतो.

दीर्घकालीन बेरोजगारीचे लेणे उमेदवारीच्या काळात प्रारंभीच धारण करावे लागण्याचे प्रतिकूल परिणाम अशा तरूण होतकरूंना पुढे आयुष्यभर भोगावे लागतात. यामुळे होणारी त्यांची हानी मोठी जीवघेणी असते. ‘नोकरी नाही म्हणून अनुभव नाही आणि अनुभव नाही म्हणून नोकरी नाही’, अशा दुष्टचक्रात हे तरूण पुढे हयातभर गुरफटले जातात. अमेरिकेतील मंदीचा लाभ उद्योगव्यवसाय नोकरकपातीसाठीही उठवताना दिसतात. नोकरकपातीचे पाऊल एरवी उचलले असते तर त्यांना प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले असते. आता, बाजारपेठीय परिस्थितीचा फायदा घेत अनेक कारखानदारांनी मनुष्यबळाच्या ठिकाणी यंत्र-तंत्राची योजना करण्याचा धडाका लावलेला आहे. केवळ इतकेच नाही तर, अर्धवेळ, कंत्राटी वा हंगामी कामगार नेमण्याकडेच कारखानदारांचा ओढा आताशा वाढलेला दिसतो. परिणामी, अर्धवेळ काम करणा-यांचे अमेरिकेतील एकंदर कामगारांत असलेले प्रमाण २०१० साली जवळपास २० टक्क्यांना टेकलेले होते.

**वाटचाल रोजगार संधींच्या ध्रुवीकरणाकडे ?**

श्रमांच्या अमेरिकी बाजारपेठेत दृग्गोचर होऊ लागलेले हे सारे नवीन प्रवाह येत्या काळात सक्रिय राहतील अशी चिन्हे निदान आज तरी दिसतात. मॅकेन्झीने अलीकडे केलेल्या एका पाहणीनुसार अमेरिकेतील एकंदर कंपन्यांपैकी जवळपास ५८ टक्के कंपन्या येत्या पाच वर्षांच्या काळात सर्वसाधारणपणे अर्धवेळ कामगारांचीच नियुक्ती मुख्यत्त्वे करतील, असा कल दिसतो. तसेच, उर्वरित कंपन्यांपैकी जवळजवळ २२ टक्के कंपन्या त्यांची अधिकाधिक कामे 'आउटसोर्सिंग'द्वारा करून घेण्याच्या मानसिकतेमध्ये असल्याचे स्पष्ट होते. या अशा विविध प्रवाहांपायी उपलब्ध होऊ शकणा-या रोजगार संधींच्या संख्येपेक्षाही अथवा संख्येइतकेच रोजगाराची गुणवत्ता, रोजगार अथवा नोकरीशी संलग्न असणारी सुरक्षितता (जॉब सिक्युरिटी), श्रमिकांना मिळणारे वेतनादी लाभ यांसारखे गुणात्मक पैलू येत्या काळात अतिशय संवेदनशील ठरणार आहेत.

या सगळ्या बदलांचा एक संभाव्य परिणाम म्हणजे, जगभरातील अनेक श्रीमंत देशांतील श्रमांच्या बाजारपेठेत रोजगारांचे एक वैशिष्ट्यपूर्ण ध्रुवीकरण घडून येत असल्याचा अनुभव येतो. नव्याने निर्माण होत असणा-या रोजगार संधी 'चांगल्या नोक-या आणि निकृष्ट रोजगार' या दोन ध्रुवांमध्ये विभागल्या जात असल्याचे चित्र दिसते. म्हणजेच, एकंदरीने श्रमांच्या बाजारपेठेत गुणात्मकदृष्ट्या मध्यम श्रेणीच्या रोजगार संधींचा वेगाने संकोच होत असल्याचे वास्तव वेगाने सामोरे येते आहे. सर्वसाधारणपणे, चांगले शिक्षण व शिक्षणाची पातळी, वेतनमान आणि नोकरी मिळण्याच्या शक्यता या तीनमध्ये घट्ट सहसंबंध असल्याचे दिसून येते. शिक्षणाची पातळी चांगली असेल तर वेतनमान आकर्षक मिळण्याबरोबरच अशी व्यक्ती बेरोजगार राहण्याची शक्यताही कमी राहते. अमेरिकेतील पदवीधारक तरूणांमध्ये बेरोजगारांचे प्रमाण २००७ साली होते दोन टक्के. हेच प्रमाण वाढून २०१० साली पोहोचले पाच टक्क्यांवर. मात्र, पदवीधारक नसलेल्या अमेरिकी तरूणांमधील बेरोजगारीच्या प्रमाणात २००७ ते २०१० याच कालावधीत पाच टक्क्यांवरून थेट ११ टक्क्यांपर्यंत वाढ घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येते.



माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीनेही अमेरिकी बेरोजगारीच्या निवारणामध्ये मोठ्या मजेशीरपणे पाचर मारून ठेवलेली दिसते. उद्योगव्यवसायांत माहिती-तंत्रज्ञानाचा वापर विस्तृत प्रमाणावर केला जात असल्याने उत्पादित वस्तू व सेवांना असणारी बाजारपेठीय मागणी आणि त्या मागणीतील चढ-उतारांशी श्रमशक्तीला असणा-या आनुषंगिक मागणीतील चढ-उतारांची सांगड घालणे कंपन्यांना आता शक्य बनलेले आहे. त्यामुळे, अमेरिकी अर्थव्यवस्थेचा सर्वसाधारण नूर जरी आता हळूहळू पालटत असला तरी वस्तू व सेवांच्या मागणीला जोवर ठोस उठाव येत नाही तोवर नोकरभरती सुरू करण्यास अमेरिकी कंपन्या नाखूष दिसतात. एकंदरच उत्पादन-वितरण प्रणालीमध्ये माहिती-तंत्रज्ञानाचे वाढते उपयोजन आणि त्यांद्वारा श्रमशक्तीला असणा-या मागणीची वस्तू व सेवांना असणा-या मागणीशी थेट घातलेली सांगड यांमुळे अमेरिकी उद्योगांची मानसिकता अशी बनलेली असल्याचे काही तज्ज्ञांचे निरीक्षण सांगते.

अर्थात, अमेरिकी कंपन्यांची ही अलीकडे बदललेली कार्यशैली आणि मानसिकता नवसर्जनाच्या भविष्यकालीन शक्यता कोमेजून टाकणारी ठरेल, अशी भीती एडमंड फेल्प्स यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांना आताशा वाटू लागलेली आहे. भविष्यात कार्यान्वित करावयाच्या काही प्रकल्पांसाठी संघटित उद्योगव्यवसायांनी काही एक प्रमाणात राखीव मनुष्यबळ हे आधीच पदरी घेऊन ठेवलेले असते. २००८ साली उद्‌भवलेल्या वित्तीय अरिष्टानंतर अमेरिकी कंपन्यांनी अशा राखीव मनुष्यबळावर कपातीची कु-हाड मोठ्या आक्रमकपणे चालविली. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीत २००८ सालानंतर जी एकदम वाढ झालेली दिसते तिच्यामागील मुख्य कारण हेच असल्याचे फेल्प्स यांचे प्रतिपादन आहे. हे सर्जनक्षम मनुष्यबळ आता रोजगारातून बाहेर गेले आहे. परिणामी, नवसर्जनाच्या दिशा धुंडाळण्याकडे त्याचा विनियोग होणार नसल्याने अमेरिकी कंपन्यांना याची किंमत येत्या भविष्यात नक्कीच मोजावी लागेल, यांकडे फेल्प्स यांच्यासारखे अर्थतज्ज्ञ आताशा लक्ष वेधत आहेत. एरवी ज्या शासकीय धोरणांना कडाडून विरोध झाला असता अशा काही धोरणांबाबत बेरोजगारीच्या या गहन समस्येपायी अमेरिकेत आस्था निर्माण झाल्याचे दिसते. ***(कृपया पृष्ठ ३० पाहावे)***

रोजगार

# बेरोजगारीवरील ‘स्ट्रक्चरल’ उपाय

चांगल्या गुणवत्तेच्या, उत्पादक स्वरूपाच्या नोक-या व रोजगार संधी अर्थव्यवस्थेत पुरेशा प्रमाणात निर्माण करणे हे, मंदीच्या तडाख्यात सापडलेल्या अमेरिकेपासून ते चीन व भारतासारख्या मंदीपासून बचावलेल्या आशियाई अर्थव्यवस्थांपर्यंत सगळ्यांच्याच समोरील आजघडीचे मोठे आव्हान आहे. अमेरिकेसह एकंदरच युरोपीय समुदायातील श्रीमंत अर्थव्यवस्थांसमोर ठाकलेले बेरोजगारीचे आजचे संकट हे मुख्यतः २००८ साली प्रसवलेल्या वित्तीय अरिष्टातून निपजलेले आहे, असे जे एक प्रतिपादन केले जाते ते अचूक असले तरी अपुरे आहे, असे विश्लेषण काही प्रथितयश अर्थतज्ज्ञांकडून आताशा मांडले जाताना दिसते. एडमंड फेल्प्स तसेच मायकेल स्पेन्स यांच्यासारखे नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ सध्याच्या बेरोजगारीचा संबंध संपूर्ण जगभरातच गेल्या तीन दशकांदरम्यान साकारत असलेल्या नानाविध संरचनात्मक (स्ट्रक्चरल) स्वरूपाच्या मूलभूत बदलांशी जोडत आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे परस्परांत गुंफल्या जात असलेल्या देशोदेशीच्या बाजारपेठा, त्यांतून आकाराला आलेले वैश्विक श्रमविभागणीचे प्रारूप, वस्तुनिर्माण उद्योगांचे आशिया खंडाकडे झालेले स्थलांतर आणि या सगळ्याच्या मुळाशी असणारे तंत्रज्ञानात्मक बदल यांसारख्या दीर्घकालीन प्रवाहांचा पार्श्वपट आजच्या बेरोजगारीच्या वास्तवाला लाभलेला आहे, असे विश्लेषण आता अर्थतज्ज्ञांकडून मांडले जाते आहे. संपूर्ण जगभरातच हे बदल वेगवेगळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारे पृष्ठभागावर येताना दिसतात. या विविध घटकांच्या समांतर आणि एकत्रित परिणामातून अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीच्या नैसर्गिक दरात अलीकडील काळात वाढ घडून आलेली आहे, असे फेल्प्स यांचे स्पष्टीकरण. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा नैसर्गिक दर आज जवळपास साडेसात टक्क्यांच्या घरात आहे.



उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणा-या तंत्रज्ञानामध्ये घडून आलेली अप्रतिहत प्रगती रोजगाराच्या मुळावर येत असल्याचे, अनेक तज्ज्ञांकडून सांगितले जाते. परंतु, तंत्रज्ञानात्मक सुधारणांमुळे घडून येत असलेल्या अशा बदलांची तीव्रता जागतिकीकरणाच्या वाहत्या प्रवाहांपायी अधिकच वाढते आहे, असे स्पेन्स यांचे प्रतिपादन होय. उत्पादन तंत्रातील सुधारणांपायी उत्पादन प्रक्रियेचे बहुकेंद्रीकरण सुलभ बनले. देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांनी समांतर पद्धतीने उदारीकरणाच्या तत्त्वज्ञानाचा अवलंब केल्याने अर्थव्यवस्थांच्या सीमा परकीय भांडवल तसेच उद्योगांना खुल्या झाल्या. या दोहोंमुळे वस्तुनिर्माण उद्योगांचे स्थलांतर पश्चिमेतील प्रगत अर्थव्यवस्थांकडून आशिया खंडातील प्रगतिशील अर्थव्यवस्थांकडे घडून आले. या सगळ्या बदलांमधून वैश्विक पातळीवर जी श्रमविभागणी साकारली तिच्याद्वारे विकसित तसेच विकसनशील देशांमधील उच्चशिक्षित, गुणवान, उत्पादक स्वरूपाची कौशल्ये कमावलेल्या, तंत्रकुशल अशा निवडक परंतु मोजक्या कामगार-श्रमिकांच्या रोजगार पर्यायांचा पट विस्तारला. यांतूनच, चांगल्या गुणवत्तेच्या नोक-या आणि हिणकस स्वरूपाचे रोजगार असे श्रमांच्या बाजारपेठेचे द्विध्रुवीकरण बळकट बनायला लागले.

या वास्तवाची एक मोठी वैशिष्ट्यपूर्ण परिणती म्हणजे बेरोजगारीचे संकट आज जरी सर्वत्रच उद्‌भवलेले दिसत असले तरी देशोदेशीच्या श्रमदलांतील सर्वच श्रमिकांना त्याचे चटके सम प्रमाणात बसताना दिसत नाहीत. उलट; बँकिंग, माहिती-तंत्रज्ञान व माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवा, वस्तुनिर्माण उद्योगांतील मध्यम तसेच वरिष्ठ पदांवरील अभियंते, कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापक, उच्चशिक्षित अशा कार्यकुशल उच्चपदस्थांचा उद्योगव्यवसायांना तुटवडाच भासत असल्याचा अनुभव ठिकठिकाणी येतो. साहजिकच, अशा कुशल मनुष्यबळाला प्रचंड मागणी आहे. त्या मागणीच्या तुलनेत अशा प्रशिक्षित, अनुभवी मनुष्यबळाचा तुटवडा असल्याने लायक मनुष्यबळ आकर्षक पॅकेज अदा करून आपल्याकडे खेचण्यासाठी जगभरातील आघाडीच्या उद्योगांमध्ये चढाओढ सुरूअसल्याचे चित्र सामोरे येते. परिणामी, सर्वसाधारण श्रमिक आणि शिक्षित-प्रशिक्षित तंत्रकुशल कर्मचारी यांच्या वेतनातील दरी जगभरातच चांगल्यापैकी रुंदावत जाताना दिसते.

श्रमांच्या बाजारपेठेतील ही विषमता सातत्यशील राहणे हे कोणाच्याही हिताचे नाही. या वास्तवाचे दुष्परिणाम दुहेरी स्वरूपाचे आहेत. एक तर, तुलनेने मोजके असलेले शिक्षित-प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ आकर्षित करण्यासाठी त्यांना अधिकाधिक आकर्षक पे-पॅकेजेस् देण्याची शर्यतच जणू आघाडीच्या उद्योगांमध्ये सुरू होते. त्यातून तंत्रकुशल कर्मचा-यांच्या वेतनावरील खर्च झपाट्याने वाढत जातो. परिणामी, उद्योगांच्या एकंदरच उत्पादन खर्चात वाढ घडून येण्याने त्यांची बाजारपेठीय स्पर्धात्मकता हरपते आहे. दुसरीकडे, कुशल आणि अर्धकुशल वा अकुशल श्रमिकांच्या वेतनमानातील विषमतेपायी नाना प्रकारचे सामाजिक ताणतणाव देशोदेशी निर्माण होत आहेत. चांगल्या प्रकारचा रोजगार मिळण्याबाबतच्या हमीची चिंता सतावत असल्याने अस्थिरता मनीमानसी दाटलेल्या तरूणाईचा संतापच गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात ब्रिटनमध्ये पेटलेल्या दंगलींच्या माध्यमातून प्रगटला, असे विश्लेषण आता तिथे मांडले जाते आहे. केवळ इतकेच नाही तर, उत्पादक स्वरूपाच्या पुरेशा रोजगाराची वानवा हेच ट्युनिशिया व इजिप्तसारख्या अरब राष्ट्रांमध्येही २०११ साली उसळलेल्या जनक्षोभामागील एक कळीचे कारण होते, असे मार्मिक विश्लेषण अनेक समाजाभ्यासक आताशा करताना दिसतात. चीन व भारत यांच्यासारख्या आशियाई आर्थिक महासत्तांसमोरील मोठी समस्याही नेमकी हीच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत तर तरूणांची संख्या मोठी असल्याने अशा सर्जक मनुष्यबळाच्या क्षमतांचा उत्पादक वापर पुरेपूर करून घेण्याचे मोठेच आव्हान आज भारतीय धोरणकर्त्यांसमोर आहे.

देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांतील बेरोजगारीच्या समस्येचे मूळ जर वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये साकारणा-या संरचनात्मक बदलांमध्ये रुजलेले असेल तर अशा 'स्ट्रक्चरल' बेरोजगारीवर तितकाच परिणामकारक असा 'स्ट्रक्चरल' उपाय शोधला गेला पाहिजे, यांबाबत आघाडीच्या अर्थतज्ज्ञांमध्ये आता एकवाक्यता निर्माण होताना दिसते आहे. कोणत्याही प्रकारच्या संरचनात्मक उपायांची आखणी आणि अंमलबजावणी ही तशी दीर्घकालीन प्रक्रिया असली तरी त्या दिशेने आजच पावले उचलली जाणे आवश्यक आहे, असा आग्रही सूर आज अनेक तज्ज्ञ व धोरणकर्ते लावताना दिसतात.



**बदल हवा शिक्षण-प्रशिक्षण प्रणालीत**

'स्ट्रक्चरल' स्वरूपाच्या बेरोजगारीवर जी 'स्ट्रक्चरल' स्वरूपाचीच उपाययोजना करावयाची तिचा मुख्य भर हा शिक्षण-प्रशिक्षण प्रणालीत अनुरूप सुधारणा/बदल घडवून आणण्यावर असावयास हवा, यांबाबत तज्ज्ञांमध्ये दुमत दिसत नाही. या संरचनात्मक सुधारणांचे मुख्य पैलू साधारणपणे चौरंगी आहेत. ते असे : (१) उद्योगव्यवसायांच्या मनुष्यबळविषयक गरजा आणि विद्यापीठीय शिक्षणाची विद्यमान प्रणाली यांच्यादरम्यान सुसंवाद प्रस्थापित करणे (२) प्रशिक्षित मनुष्यबळाची उद्योगांची गरज ध्यानात घेऊन तिच्याशी सुसंगत अशा सुधारणा सध्याच्या शिक्षणपद्धतीत तसेच अभ्यासक्रमांत आवश्यक घडवून आणणे (३) देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांतील करसंरचना आणि सामाजिक सुरक्षेचे कवच यांत आवश्यक ते फेरबदल जारी करणे; आणि (४) नवसर्जक, नवशोधक अशा उपक्रमशील उद्योजकतेला सर्व स्तरांवर चालना देणे. अमेरिकेसह जगातील सर्वच प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये या प्रकारच्या संरचनात्मक सुधारणांबाबत आजमितीस जोरदार चिंतनमंथन सुरू असल्याचे दिसते.

उद्योगांच्या मनुष्यबळविषयक गरजा आणि प्रचलित शिक्षणपद्धती व अभ्यासक्रम यांत सुसंवाद-समन्वय प्रस्थापित होण्यासाठी या दोहोंत प्रथम संपर्काचे पूल तयार होणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने करावयाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, रोजगार निर्मितीसंदर्भातील सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी जगद्विख्यात अशा 'जीई' कंपनीचे अध्वर्यू जेफ् इमेल्ट यांची नियुक्ती अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी केली. अर्थात, ओबामा यांच्या या निर्णयाबाबत टीकाही झाली. इमेल्ट यांच्या सूचनांचा एक भर आहे तो कंपनी कराच्या अमेरिकी दराबाबत. इमेल्ट यांच्या मते, कंपन्यांनी कमावलेल्या नफ्यावर अमेरिकेत आकारला जाणारा कंपनी कराचा सीमान्त दर अवाजवी असल्याने अनेक उद्योग आपले बस्तान अन्य देशांत हलवणे पसंत करतात. हा सीमान्त दर घटवून वाजवी स्तरावर आणून ठेवला गेला तर अनेक अमेरिकी कंपन्या स्वदेशातच आपला कारभार थाटतील इतकेच केवळ नव्हे तर अन्य देशांतील भांडवल आणि कारखानदारीही अमेरिकेकडे आकर्षित होऊन त्याद्वारे रोजगारनिर्मितीस जोरदार चालना मिळू शकेल.

परंतु, अशा प्रकारच्या करविषयक बदल व सुधारणा या वेळखाऊ असल्याने अमेरिकी शिक्षण-प्रशिक्षण प्रणालीत फेरबदल घडवून आणण्यावर भर दिला जावा, असे इमेल्ट यांनी आग्रहपूर्वक सुचविलेले आहे. हे बदल एकूण तीन पदरी आहेत. देशातील उच्चशिक्षणाच्या विद्यमान व्यवस्थेत काही मूलभूत व दूरगामी बदल हाती घेतले जाण्याची निकड या समितीने अधोरेखित केलेली दिसते. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित यांसारख्या विषयांतील पदवीधरांच्या संख्येत आगामी काळात वाढ घडून येण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आलेला आहे. बदलांचा हा झाला पहिला पदर. तर, अमेरिकी उद्योगांच्या तंत्रशिक्षणप्रशिक्षित मनुष्यबळाच्या विविक्षित गरजा लक्षात घेऊ न त्यांनुसार अभ्यासक्रमांत बदल घडवून आणणे, हा झाला सुधारणांचा दुसरा पदर. अमेरिकी उद्योगांच्या कर्मचारीविषयक गरजा भागवू शकतील अशा प्रकारचा 'स्किलसेट' पदरी असलेले तंत्रकुशल पदवीधर अमेरिकी विद्यापीठांमधून बाहेर पडले तर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील 'स्ट्रक्चरल' बेरोजगारीचा विळखा सैल होण्यास हातभार लागेल, असे तर्कशास्त्र या प्रतिपादनामागे आहे. परंतु, या पर्यायाची फळेही पुन्हा दीर्घकाळातच मिळत असतात. त्यामुळे, अमेरिकी अर्थव्यवस्थेत नवशोधन आणि नवसर्जनाच्या प्रेरणांचे भरणपोषण करणारी धोरणे आक्रमकरीत्या अवलंबली जावीत, असा तिसरा पदर इमेल्ट सुचवितात.

नवसर्जनकारक उद्यमशीलतेला चालना मिळण्याने बहुस्तरीय रोजगारनिर्मितीच्या वाटा खुल्या होतात, असा या क्षेत्रातील तज्ज्ञांचा अनुभवसिद्ध दाखला सांगतो. नवशोधनाला वाव मिळाल्याने नाना प्रकारच्या नवीन वस्तू व सेवांच्या निर्मितीस अवकाश खुले होते. नवनवीन उत्पादनांचा शोध मग जारीने सुरू होतो. नवशोधित वस्तू व सेवांच्या उत्पादनास त्यातून बहर येतो. नवनिर्मित उत्पादनांच्या तपासण्या-चाचण्यांचे एक नवेच क्षेत्र त्यातून उदयास येते. नवनिर्मित जिनसांचे वितरण व विक्रीचा एक मोठा व्यवसाय कालांतराने मूळ धरतो. या अशा सगळ्याच अंगोपांगांत शिक्षित-प्रशिक्षित तसेच कुशल-अर्धकुशल मनुष्यबळाची निकड जाणवत असते. त्यामुळे, नवसर्जनाला व्यापक प्रोत्साहन हे संरचनात्मक बेरोजगारीवरील एक औषध म्हणून आता जगभरात विचाराधीन आहे. ■■



*(पृष्ठ क्रमांक २४ वरून)*

स्वस्त मनुष्यबळाच्या आशेने अमेरिकी अर्थव्यवस्थेबाहेर पाय घालणा-या वस्तुनिर्माण उद्योगांना रोखण्याच्या दृष्टीने अनुरूप अशी औद्योगिक धोरणे आखून त्यांची तामिली सरकारने करावी, अशा प्रकारची भावनावजा मागणी अमेरिकेमध्ये आता मूळ धरू लागलेली आहे. वस्तुनिर्माण उद्योगांसाठी काही खास अनुदाने वा अर्थसाह्यात्मक उपक्रमांचा विचार सरकारने गांभीर्याने करावा, अशी मानसिकता तयार होते आहे. निवासी तसेच कार्यालयीन इमारतींची ऊर्जावापराची कार्यक्षमता उंचावण्यासाठी बेरोजगार मनुष्यबळाचा विनियोग केला जावा, असा एक विचारप्रवाह अमेरिकेत मध्यंतरी होता. परंतु, विद्युत उपकरणांशी संबंधित कोणत्याही प्रकारची कौशल्ये हातात नसलेल्या बेरोजगार होतकरूचे रूपांतर कसबी इलेक्ट्रिशिअनमध्ये लगोलग कसे व्हावे, अशी मूलभूत आणि रोकडी शंका अनेक संबंधितांनी तत्काळ उपस्थित केली !

आपल्या देशात मुबलक प्रमाणात उपलब्ध असणा-या स्वस्त मनुष्यबळरूपी भांडवलास पायाभूत सेवासुविधांमधील गुंतवणुकीचा आधार पुरवत जगभरातील उद्योग आकर्षित ठेवणा-या चीनला डोळ्यासमोर ठेवून, मग, त्याच धर्तीवर अमेरिकेतही पायाभूत सेवासुविधांचे जाळे अद्ययावत बनविण्यात यावे, अशा प्रकारचा एक धोरणात्मक पर्याय पुढे मांडण्यात आला. निदान त्यामुळे तरी अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योग अन्य देशात स्थलांतर करणार नाही आणि मग अमेरिकी अर्थव्यवस्थेतच रोजगारनिर्मिती होण्यास चालना मिळेल, असे तर्कशास्त्र त्यामागे होते. आधीच 'सब्प्राइम' कर्जांच्या प्रकरणात अमेरिकी बांधकाम उद्योगाचे कंबरडे मोडलेले असल्याने हा पर्याय त्याच्याही पथ्यावरच पडणारा होता व आहे. परंतु, या पर्यायाचेही प्रभावशाली उपयोजन घडवून आणण्यात दोन अडचणी अमेरिकी तज्ज्ञ तसेच धोरणकर्त्यांना जाणवू लागल्या. त्या अशा की, प्रथम म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणावर पायाभूत सेवासुविधांचा पसारा सिद्ध करावयाचा तर सरकारपाशी बख्खळ पैसा हवा. आणि दुसरे म्हणजे, एकंदरच बांधकाम तंत्रज्ञान आज एवढे प्रगत झालेले आहे की आता पूर्वीइतके मनुष्यबळही लागत नाही. अमेरिकी बेरोजगारीचा तिढा मग सुटावा कसा ? ■■

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## नागरी वाहतूक समस्येचे सद्य:चित्र

**- डॉ. एस्. श्रीरामन**

वेगवेगळ्या आकारमानांच्या शहरांची निर्मिती आणि वाढ हे नागरीकरणाच्या विकास-विस्तार प्रक्रियेचे अभिन्न अंग गणले जाते. एखाद्या ठिकाणी लोकसंख्येचे केंद्रीकरण होण्यातून त्या स्थानाचे रूपांतर 'शहरा'मध्ये होऊ लागते. एखाद्या स्थानावर लोकसंख्येचे केंद्रीकरण होण्यास अक्षरशः अनंत घटक कारणभूत असतात. स्थानिक हवामान, पाण्याची उपलब्धता, जमिनीचा कस, लष्कर अथवा राजाच्या निवासाचे ठाणे, तीर्थक्षेत्र वा धार्मिक स्थळ म्हणून त्या ठिकाणाचा असणारा महिमा... असे अनेक घटक शहरांच्या निर्मितीस हातभार लावत असतात. या अनेकानेक घटकांमधील एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे वाहतुकीची साधने, वाहतुकीचे तंत्रज्ञान आणि दळणवळणाची व्यवस्था. वाहतूक हा शहरांच्या स्थानांकनावर प्रभाव टाकणारा एक कळीचा घटक मानला जातो.

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २३ व २४ सप्टेंबर २०११ अशा दोन दिवशी संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका राष्ट्रीय परिसंवादात (१) महाराष्ट्रातील नागरीकरण (२) महाराष्ट्रातील औद्योगिक रोजगार आणि (२) राष्ट्रीय वाहतूक धोरण या तीन बीजविषयांवर संस्थेशी संलग्न असलेल्या डॉ. एस्. श्रीरामन, अभय टिळक व डॉ. शरदिनी रथ तीन अभ्यासकांनी विवेचक सादरीकरण केले होते. त्यांपैकी, अभय टिळक यांच्या सादरीकरणाचा गोषवारा 'अर्थबोधपत्रिके'च्या डिसेंबर २०११च्या अंकात सादर केलेला होता. डॉ. शरदिनी रथ यांनी केलेल्या सादरीकरणाचा गाभा दोन भागांत अनुक्रमे जानेवारी व फेब्रुवारी २०१२ च्या अंकांत मांडण्यात आला. आता, प्रा. डॉ. श्रीरामन यांनी आपल्या देशातील नागरी वाहतूक समस्येच्या संदर्भातील विविध परिमाणांच्या केलेल्या ऊहापोहाचा सारांश या ठिकाणी सादर करण्यात येत आहे. -संपादक**



अर्थात, शहराचे स्थानांकन निश्चित करण्यापुरतेच वाहतूक या घटकाचे माहात्म्य सीमित करणे चुकीचे ठरेल. अस्तित्त्वात आलेल्या एखाद्या शहराचा भौगोलिक वा भौतिक विस्तार किती, कसा व कोणत्या दिशांनी कोठवर घडून येईल हे सर्वस्वी त्या शहरात कार्यरत असणा-या वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहते. शहराची अंतर्गत रचना, त्याची लांबी-रूंदी, चतु:सीमांचा विस्तार म्हणजेच पर्यायाने त्या शहराचा आकार यांवरही वाहतूक या घटकाचा दृढ प्रभाव असतो. शहरात वास करणारे नागरिक आणि त्या नागरिकांना लागणा-या सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांची शहरांतर्गत वाहतूक, अशा वाहतुकीसाठी निर्माण झालेली वा करण्यात आलेली व्यवस्था, त्या व्यवस्थेची कार्यक्षमता, अशा कार्यक्षमतेमधून निपजणारी वाहतुकीची सुलभता अशा सगळ्या बाबींचा त्या त्या शहराच्या एकंदर प्रकृतीवर आणि अर्थकारणावर बरावाईट परिणाम होत असतो. किंबहुना, शहरांमध्ये होणारे लोकसंख्येचे केंद्रीकरण, उद्योगव्यवसाय आणि भांडवलाचा शहरोशहरी वाहणारा ओघ यांचे प्रमाण व वेग हा त्या त्या शहरात विद्यमान असणा-या वाहतूक व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून असतो. पर्यायाने, शहरी अर्थकारणाची आणि एकंदर नागरी जीवनाची कार्यक्षमता वाहतूक व्यवस्थेच्या कार्यक्षम चलनवलनावरच विसंबलेली असते. आपल्या देशात मात्र या संदर्भात दिसणारे चित्र विपरीत आहे. नागरीकरणाचा आपल्या देशातील विस्तार ज्या प्रकारे घडून येतो आहे, ज्या पद्धतीने मोठी शहरे आणि महानगरे आपल्या देशात वाढत आहेत त्यांमुळे शहरांतर्गत वाहतूक व्यवस्थेचीच कार्यक्षमता खालावलेली दिसते !

आपल्या देशातील बव्हंश मोठ्या शहरांतील वाहतूक व्यवस्थेचा आज पुरता बोजवारा उडालेला दिसतो. हे वास्तव आजचे नाही. ही परिस्थिती अनेक दशकांपासूनची आहे. ही परिस्थिती उत्तरोत्तर अधिकच बिकट होत चालल्याचे आपण सगळेच अनुभवतो आहोत. घडी विस्कटलेल्या वाहतूक व्यवस्थेचा प्रतिकूल परिणाम शहरांतर्गत चलनवलन (माणसांचे आणि वस्तू व सेवांचेही) आणि पर्यायाने शहराच्या एकंदर वाढीवरच घडून येत असल्याचा अनेक खुणा आज आपल्याला पदोपदी दिसतात. शहरी जीवनमानाचा गुणात्मक दर्जा त्यामुळे ढासळलेला आहे.

शहरी वाहतुकीच्या आपल्या देशातील समस्यांमागील कारणे बहुविध आहेत. त्यांचे अंतरंग पुढीलप्रमाणेः

**(१) वाहतुकीच्या साधनांमधील वैविध्यः**

शहरांतर्गत वाहतुकीच्या साधनांमधील प्रचंड वैविध्य हे यांतील पहिले कारण ठरते. कोणत्याही शहरातील रस्त्यावर नजर टाकली तर बैलगाडी-हातगाडीपासून ते सायकली, सायकल रिक्षा, तीन चाकी स्वयंचलित रिक्षा, स्कूटर-मोटरसायकली, चार चाकी प्रवासी गाड्या, सार्वजनिक वाहतुकीच्या बसगाड्या, अन्य प्रवासी वाहने, मालवाहतूक करणारी तीन व चार चाकी वाहने... असे वाहतुकीच्या साधनांचे प्रचंड वैविध्य आपल्याला एकाच वेळी आढळून येते. साधनांमधील अशा बहुविधतेचा परिणाम शहरांतर्गत वाहतुकीच्या सरासरी वेगावर घडून येतो. कारण, या प्रत्येक साधनासाठी वापरलेली ऊर्जा आणि तंत्रज्ञान वेगवेगळे असते. त्यानुसार त्या त्या वाहतूक साधनाचा सरासरी वेग बदलतो. वेगवेगळ्या वेगाने पुढे सरकणारी अनेकविध वाहने एकाच वेळी रस्त्यावर असतील तर अशा वाहतुकीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन जिकिरीचे बनते. रस्त्यावर असणा-या वाहनांची बहुविधता आणि एकंदर गर्दी यांची परिणती वाहनांच्या सरासरी वेगात घट होण्यात घडून येते. साहजिकच त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढतो. शहरोशहरीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था या सगळ्या वास्तवाची पहिली बळी ठरते. दुसरीकडे, कमी वेगापायी वाहनांची इंधनक्षमता मार खात असल्याने खासगी वाहनधारकांच्या खिशावरही ताण येतो.

**(२)सार्वजनिक वाहतुकीची अपुरी सुविधाः**

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता आणि वित्तीय किफायतशीरता खालावली की आपोआपच त्या सुविधेची उपलब्धता आणि गुणवत्ता खालावते. मुळात, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे अर्थकारणच बिघडलेले असल्याने सुविधेच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणणे संबंधित यंत्रणांना दुष्कर ठरू लागते. हे एक दुष्टचक्रच मग अव्याहत फिरायला लागते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये शून्य अथवा अत्यल्प सुधारणा होण्याने त्याच सेवेवर बव्हंशी निर्भर असलेल्या शहरी घटकांची कार्यक्षमता धोक्यात येते.



विशेषतः, शहरी असंघटित क्षेत्रांतील व्यावसायिक, शहरांतील गोरगरीब, हातावर पोट असणारे कष्टकरी, अपंग नागरिक अशा सगळ्यांच्या चलनवलनावर आणि मुख्यतः आर्थिक परिस्थितीवर खालावलेल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची आच येते. त्यांची उत्पादकता घटते आणि त्यामुळे अशा सामाजिक घटकांचे आर्थिक-व्यावसायिक जीवन अस्थिर बनते.

**(३)सार्वजनिक वाहतूक क्षमतेचा अपुरा वापरः**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता आणि वित्तीय किफायतशीरता खालावल्याने त्या सुविधेच्या निर्मित क्षमतेचा पुरेपूर वापर केला जाण्यात अडथळे येतात. मोठ्या शहरांतील बससेवेच्या ताफ्यातील एकंदर बसगाड्यांपैकी किती गाड्या प्रत्यक्षात सरासरीने रस्त्यावर धावतात, हे या संदर्भात बघणे अगत्याचे ठरते. प्रस्थापित क्षमतेचा पुरेपूर वापर न होण्याने, पुन्हा, त्या सुविधेच्या वित्तीय प्रकृतीला झळच लागते. शहरांतर्गत भू-वापर आणि वाहतूक नियोजन यांत ताळमेळ नसण्याचाही फटका या सगळ्या सुविधेला अपरिहार्यपणे बसतोच.

**(४)खासगी वाहनांची बेसुमार संख्याः**

शहरांतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता खालावली की शहरवासी आपोआपच शहरांतर्गत चलनवलनासाठी आपापल्या वाहनांवर अवलंबून राहू लागतात. त्यातून शहरोशहरीच्या रस्त्यांवरील खासगी वाहनांची संख्या फुगायला लागते. अर्थात, मोठ्या शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा खालावलेला दर्जा हे एकमात्र कारणच यामागे आहे, असेही म्हणवत नाही. वाहन उद्योगाला चालना देण्याचे सरकारचे धोरणही या प्रक्रियेस हातभार लावत असतेच. वाहन उद्योग हा रोजगाराची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करणा-या उद्योगांत आघाडीवर असलेला उद्योग गणला जातो. या उद्योगाला चालना मिळावी यासाठी बँकांनीही वाहन खरेदीसाठी सुलभ वाहनजकर्जांच्या योजना धडाक्याने राबविल्याचे अलीकडील काळात आपण सातत्याने बघतो आहोत. आपल्या देशातील 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चाही या प्रक्रियेला हातभार लागतोच आहे. तरुणाईचे संख्यात्मक प्राबल्य असलेल्या आपल्या अर्थव्यवस्थेत मोटरसायकलींसारख्या वेगवान दुचाकींकडे तरूणांचे ध्यान आकर्षित व्हावे, हे ओघानेच येते.

गंमत अशी की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या अकार्यक्षमतेपायी खासगी वाहनांचा केला जाणारा वाढता वापर हा पुन्हा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या मुळावरच उठणारा ठरतो. दुचाकी-तीन चाकी-चार चाकी वाहनांची संख्या रस्तोरस्ती वाढू लागल्याने रस्त्यांवरील वाहनांची गर्दी फुगते. वाहनांची संख्या आणि त्यांतील वैविध्य वाढले की वाहतुकीचा सर्वसाधारण वेग मंदावतो. वेग मंदावला की सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसह एकंदरच वाहतूक प्रणालीचा दर किलोमीटर अंतरामागील सरासरी खर्च वाढतो. नफेबाजी हे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे उद्दिष्ट मुळातच नसल्याने वाढीव खर्चाचा भार सर्वसामान्यांच्या खिशाकडे सरकवता येत नाही. त्यातून सार्वजनिक वाहतूक सेवेची वित्तीय किफायतशीरता मार खाते. तोटा वाढू लागतो. मग, गरज वाढली तरी ताफ्यातील वाहनांच्या संख्येत भर घालता येत नाही. परिणामी, नादुरुस्त वाहनांची संख्या व एकूणांतील त्यांचे प्रमाण वाढू लागते. मग, उपयोगात असलेल्या आणि रस्त्यांवर धावणाऱ्या सार्वजनिक वाहनांवरील ताण वाढतो. त्या प्रमाणात सार्वजनिक वाहतूक सेवेचा दर्जा खालावतो. वेळापत्रक ढासळते. सार्वजनिक वाहतूक सेवेच्या ढिसाळ व्यवहाराला विटलेले शहरवासी मग स्वतःचे वाहन रस्त्यावर उतरवण्यास उद्युक्त बनतात. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न... हे चक्र मग असेच फिरत राहते.

या अशा सगळ्या कार्यकारणभावापायी शहरी वाहतुकीच्या समस्येने आपल्या देशात जटिल रूप धारण केल्याचे आपण दरदिवशी अनुभवतो आहोत. शहरी वाहतुकीच्या व्यवस्थापनाचा कणा ढासळण्यास हातभार लावणारी कारणे जितकी बहुविध आहेत तितकेच बहुविध या समस्येचे स्वरूपही दिसते. आपल्या देशातील शहरी वाहतूक समस्येचे विद्यमान अंतरंग चौरंगी आहे. ते चार पैलू असेः (१) शहरांतर्गत सर्व प्रकारच्या वाहनांच्या संख्येतील बेसुमार वाढीपायी रस्तोरस्ती होणारी वाहतूक कोंडी. (२) वाहनांची अफाट संख्या, वाहतुकीचा मंदावलेला सरासरी वेग, नित्याची वाहतूक कोंडी यांपायी वाढणारे ध्वनी व हवा यांचे शहरोशहरीचे प्रदूषण. (३) शहरांतर्गत वाहतूक व्यवस्थापन हाताबाहेर गेल्याने वाढणारे अपघात आणि (४) शहरी दुर्बल समाजघटकांची कार्यक्षम सुविधेपासूनची वंचितता.



मोठ्या शहरांची, मुख्यतः राजधान्यांची, अस्ताव्यस्त वाढ हे आपल्या देशातील नागरीकरणाचे व्यवच्छेदक लक्षण होय. अशा अंदाधुंद वाढीचे हेच सत्र भविष्यातही कायम राहील अशीच चिन्हे दिसतात. कारण, या प्रकारच्या बेधुंद वाढीस कारणभूत ठरणारे जे आर्थिक-औद्योगिक प्रवाह आहेत त्या प्रवाहांची दिशा पालटण्याचे संकेत निदान आज तरी मिळत नाहीत. अशा विषम नागरी विस्तारापायी मोठ्या शहरांमधील वाहतूक व्यवस्थेसह एकंदरच नागरी सुविधांवरील वाढता असह्य ताण, त्यापायी या सुविधांचा प्रचंड खालावलेला दर्जा, परिणामी, शहरी जीवनमानाची ढासळती गुणवत्ता... अशा नानाविध मुद्यांबाबत आपण आज अनेक वर्षे उदंड चर्चा करतो आहोत. 'मोठ्या शहरांची, महानगरांची वाढ एका विशिष्ट पातळीनंतर रोखता येणार नाही का ?; प्रत्येक शहरासाठी लोकसंख्येची एखादी पर्याप्त पातळी निश्चित करून त्या पातळीवरच त्या त्या शहराची वाढ गोठवता येणार नाही का ?' याच दोन प्रश्नांभोवती ही सारी चर्चा सतत फिरत आलेली आहे. या प्रश्नांना समाधानकारक उत्तर मिळत नाही तोवर शहरी वाहतुकीच्या समस्येचा तिढाही उलगडणे अवघड आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# दुसरी आवृत्ती प्रकाशित

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.



**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines :-** (1) The Economist September 10-16, 2011

**(B) Books/Reports : -** (1) Citizen Initiatives And Democratic Engagement : Experiences from India - Sumona Dasgupta, Routledge 2010, Tolstoy House, Tolstoy Marg , New Delhi 110 001

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

**(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)**

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणा-या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट,<br>२०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणा-या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'<br>(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी)<br>'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०१२ (प्रकाशकाची सही)



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2010-2012
Posted at Market Yard P.S.O., Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया
●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन ●जया सागडे

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**